Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Aurangabad – 431 004, Maharashtra, India
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

* परिपत्रक *

संदर्भ : १) नॅक मुल्यांकनाबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११० (४) अन्वये विहित केल्यानुसार करण्यात आलेली तरतूद.
२) पात्र दिनांकास नॅक मुल्यांकन / पुनर्रमुल्यांकन करणे बाबत शासन निर्णय दिनांक १५ जून, २०२१ व शासन निर्णय दि. ३१ ऑगस्ट, २०२१.
३) पात्र दिनांकास नॅक मुल्यांकन / पुनर्रमुल्यांकन करणेबाबत विद्यापरिषदेचा निर्णय दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१.
४) नॅक मुल्यांकन / पुनर्रमुल्यांकन करणेबाबत मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे पत्र दिनांक ०३ ऑक्टोंबर, २०२२.
५) नॅक मुल्यांकन / पुनर्रमुल्यांकन करणेबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्र. ५२८० / २०१५ न्यायनिर्णय दिनांक १६-११-२०१६.

मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयाचे व्यवस्थापन यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११० (४) अन्वये विहित केल्यानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व संलग्नीत महाविद्यालये व परिसंस्था हे अधिस्विकृती व पुनर्रअधिस्विकृती मिळण्यासाठी पात्र असलेल्या दिनांकास सर्व संबंधित महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन / पुनर्रमुल्यांकन / PAR करणे अनिवार्य आहे.

प्रस्तुत प्रकरणी विद्यापीठ अनुदान आयोग, नॅक बंगलोर, महाराष्ट्र शासन व विद्यापीठ यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार बहुसंख्य संलग्नीत महाविद्यालयांनी एकदाही नॅक मुल्यांकन व मानांकन, पुनर्रमुल्यांकन / पुनर्मानांकन प्रक्रियेत सहभाग घेतलेला नाही, असे निदर्शनास आलेले आहे. ही बाब प्रशासकिय व शैक्षणिकदृष्टया गंभीर स्वरुपाची असून विहित तरतूदींचे उल्लंघन करीत असल्याची बाब विद्यापीठाच्या निदर्शनास आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पूणे यांनी संदर्भ क्र. (०४) अन्वये विहित केल्यानुसार विद्यमान शैक्षणिक वर्षामध्ये पुढील सहा महिन्यापर्यंत नॅक / PAR या प्राधीकरणामार्फत विहित केलेल्या प्रक्रियेने नॅक मुल्यांकन / पुनर्रमुल्यांकन करुन नॅकचा अपेक्षित दर्जा प्राप्त करुन घेणे बंधनकारक आहे. उक्त प्रकरणी सर्व संबंधित महाविद्यालयांनी निर्धारित करण्यात आलेल्या विहित मुदतीत दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत नॅक मुल्यांकन / पुनर्रमुल्यांकन / PAR न केल्यास विद्यापीठ व शासनाच्या प्रचलित नियमानुसार सर्व संबंधित महाविद्यालयांचे नाव शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करिता ``No Admission`` संवर्गात वर्ग करण्यात येईल किंवा नियमामध्ये विहित केल्यानुसार संलग्नीकरण रद्द करणेबाबतची कार्यवाही विद्यापीठ स्तरावरुन सुरु करण्यात येईल, याची कृपया सर्व संबंधित महाविद्यालयांनी गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

संदर्भ क्र. शैक्ष/संलग्न/एआरडब्ल्यु/२०२२-२३/ 12517-26][
दिनांक :- १७ ऑक्टोंबर, २०२२.][
=A=

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

प्रतिलिपी :-

१) **मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक,** कुलगुरु कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

२) **मा. प्र कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक,** प्र कुलगुरु कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

३) **मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

४) **मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

५) **संचालक,** युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

६) **जनसंपर्क अधिकारी,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

७) **व्यवस्थापक,** एम.के.सी.एल., परिक्षा भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, औरंगाबाद.

८) **अध्यक्ष / सचिव,** सर्व संलग्नीत महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

९) **प्राचार्य,** सर्व संलग्नीत महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.